Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 792 – 796

DOI: 10.5281/zenodo.10279911

Original Research Article

# गांधीजींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान

प्रा. स्वामी सोनु मन्मथ

तत्त्वज्ञान विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: swamigawri555@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे शिक्षण संबंधिचे विचार क्रांतीकारक मुलभूत आणि उपयुक्त आहेत. त्याचबरोबर सत्य आणि अहिंसेची शिकवण सर्व जगाला देणारे आहे. ते प्रचलित वर्ण-वर्ग, प्रभावित शिक्षण व्यवस्था क्षीण करण्यास व व्यक्तीच्या बुद्धि सजृनशिलता व कल्पनाशक्ती या मानसिक शक्तीचा विकास करण्यास उपयुक्त आहेत. ते लोकोपयोगी श्रमाला चालना देणारे व प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आहेत. व्यक्ती व समाजाचे चारित्र्य घडविण्यास उपयुक्त असलेले हे विचार व्यक्तीमध्ये कर्तव्यनिष्ठा व सेवावृत्ती रूजविण्यास सक्षम आहेत. गांधीजीचे शिक्षण संबंधित विचार व्यवस्थित व गांभीर्याने समजून घेणे आवश्यक आहे.

'जे मुक्त करते ते ज्ञान' ज्ञानामुळे माणूस आयुष्याच्या चौकट आणि विचारांच्या पलीकडे जाऊन आयुष्याकडे मोकळेपणाने बघु शकतो. ते ज्ञान ज्यातून मिळते अशी कोणतीही गोष्ट हे एक प्रकारचे शिक्षण असते. म्हणूनच शिक्षणाचा संबंध हा अभ्यासक्रम किंवा पाठ्यपुस्तकाशी नसून जीवंत अनुभवाशी असतो. त्यांनी शिक्षण संबंधिचे विचार व्यवस्थित पद्धतीने मांडलेले नसले तरी त्यात सुसंगती आहे. त्यांचे विचार गुजराती, हिंदी आणि इंग्रजी भाषेत विखुरलेले आहेत. त्यांनी वेळोवेळी लिहीलेल्या अनेक लेखातून आणि भाषांमधून ते प्रकट झालेले आहेत. त्यांनी सत्याचे प्रयोग, हिंद स्वराज्य, रचनात्मक कार्यक्रम, विविध शैक्षणिक प्रयोग केले. हे प्रयोग त्यांनी दक्षिण अफ्रिकेत फिनिक्स आश्रम, टॉलस्टॉय फार्म आणि भारतात परतल्या नंतर शांतीनिकेतन, कोचरव आश्रम आणि सांबरमती आश्रम या ठिकाणी केले. या प्रयोगातूनच पुढे 1937 मध्ये नई तालीम हे महात्मा गांधी प्रणीत शिक्षण पद्धती उदयास आली. या पद्धतीला वर्धा शिक्षण, बुनयादी शिक्षण, बेसिक एज्युकेशन अशा विविध नावांनी ओळखले जाते. नई तालीम मध्ये त्यांनी हस्तकला, कला, आरोग्य आणि शिक्षण या चार गोष्टीचा अतिशय सुरेख मेळ घातला आहे. केवळ पुस्तकी पारंपारिक आणि पोपटपंची शिक्षणाऐवजी शारीरिक आणि बौद्धिक अशा दोन्ही श्रमाची जोड घालून शिक्षण द्यावे असा विचार या पद्धतीत त्यांनी केला होता. हे शिक्षण हस्तउद्योगाच्या माध्यमातून दिले पाहिजे असे त्यांचे मत होते. गांधी प्रणित शिक्षण पद्धती

ही कृती शिक्षणावर भर देणारी होती. हात, पाय, कान, नाक, डोळे यांच्या योग्य वापराने आणि प्रशिक्षणाने बुद्धीच खरं शिक्षण होत. अशी महात्मा गांधीची पक्की धारणा होती.

**महात्मा गांधीनी सांगितलेल्या शिक्षणाचा अर्थ**

महात्मा गांधीनी शिक्षणाचा व्यापक अर्थ सांगितलेला आहे. त्यांच्या मते साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. साक्षरता ही शिक्षणाची सुरूवात देखील नाही. साक्षरता शिक्षणाची साधन आहे. ते साध्य नाही. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्याचे शरीर, मन, आत्मा यात जे सर्वोत्कृष्ट आहे त्याचा विकास करणे होय. ते लिहितात याचा अर्थ शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यातील सर्व सामर्थ्यांचा व क्षमतांचा विकास करणे होय. महात्मा गांधीना शिक्षणातून विद्यार्थ्यांना केवळ बौद्धिक नव्हे तर शारीरीक, भावनात्मक, नैतिक आणि क्रियात्मक विकास करणे अभिप्रेत होते.

**शिक्षणाची उद्दिष्टये**

गांधी प्रणित शिक्षण पद्धती ही विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धती होती. शिक्षकाची भुमिका केवळ मार्गदर्शकाची होती. मुलातील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या आवडीनिवडी कल, अभिरूचीचा विचार करून शिक्षकांनी शिकवणे या पद्धतीत अपेक्षित होते. विद्यार्थ्यांचे चारित्र्य घडविणे हे शाळा आणि शिक्षकाचे मुख्य ध्येय असावे.

उपनिषदातील 'सा विद्या या विमुक्तये' या श्लोकात शिक्षणाचे सांगितलेले उद्दिष्टय त्यांना मान्य होते. या श्लोकाचा खरा अर्थ सांगताना ते म्हणतात, विद्या म्हणजे केवळ अध्यात्मिक ज्ञान व मुक्तीचा अर्थ आहे या जिवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे. गुलामगिरी म्हणजे दुसऱ्याच्या स्वाधीन असणे किंवा आपणच निर्माण केलेल्या कृत्रिम गरजांचे गुलाम बनने. या प्रकारची मुक्ती ज्या योगी मिळते तेच खरे शिक्षण होय. यावरून त्यांना अभिप्रेत असलेल्या शिक्षणाच्या उद्दिष्टयांची कल्पना येते.

**चारित्र्याची बांधणी**

महात्मा गांधीच्या मते शिक्षणाचे मुख्य उद्दिष्टय विद्यार्थ्याच्या चारित्र्याची बांधणी करणे हे आहे. शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडण-घडण झाली पाहिजे त्यांच्या चारित्र्याचे संवर्धन झाले पाहिजे. म्हणून महात्मा गांधी म्हणतात, "निती शिक्षणावर भर दिल्याशिवाय आपल्याला सुटका नाही." निती शिक्षण देणे अवघड गोष्ट नाही. यासाठी आपल्याला पाश्चात्य संभ्यता नाकारावी लागेल. चारित्र्य घडविणारे शिक्षणच खरे शिक्षण असते असे त्यांचे ठाम मत आहे.

महात्मा गांधीजींच्या मते - शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विवेकशिलता विकसित झाली पाहिजे. त्यांना शुभ-अशुभ, योग्य-अयोग्य, चांगले-वाईट यात भेद करता आला पाहिजे. विवेक न शिकविणारे शिक्षण खरे शिक्षण नसते. आपण मानव विचार करणारे प्राणी आहोत. शिक्षणाच्या काळात सत्य कोणते? असत्य कोणते ? कटू भाषण कोणते? मधु भाषण कोणते? शुद्ध वस्तु कोणती? अशुद्ध वस्तु कोणती? यात विवेक करायला शिकले पाहिजे. महात्मा गांधीच्या मते, शिक्षणाचे अंतिम ध्येय शिलसंपन्न, विवेकी आणि जबाबदार नागरीक तयार करणे हेच असते. परंतु त्यासाठी शिक्षण संस्थानी विद्यार्थ्याच्या विचारात, शब्दात आणि कृतीत शुद्धता कशी राहिल याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.

**आत्मनिर्भरता**

त्यांच्या मते शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थी शिक्षकांनी शिक्षणसंस्था आर्थिक दृष्टया स्वावलंबी झाल्या पाहिजेत. गांधीजीच्या समोर देशातील साडे सात लाख खेड्यातील दारिद्रय आणि

बेकारी कशी संपवता येईल ? लोकांच्या मुलभूत गरजा कशा पुर्ण करता येतील ? ग्रामीण जीवन कसे बदलता येईल? असे प्रश्न उभे होते. शिक्षणानी हे प्रश्न सोडविण्यास मदत केली पाहिजे. म्हणुन त्यांनी 'पुस्तक केंद्रीत' शिक्षणाऐवजी 'हस्तउद्योग केंद्रित' शिक्षणाचा पुस्कार केला. शिक्षणातून विद्यार्थ्याचे आणि समाजाचे प्रश्न सुटले पाहिजेत म्हणून त्यांनी शिक्षणात श्रम व उत्पादकता यावर अधिक भर दिलेला आहे. शिक्षणात त्या परिसराच्या भौतिक व सामाजिक गरजांचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. त्यातून भूक, दारिद्रय आणि बेकारी आदि प्रश्न सोडविण्यास मदत झाली पाहिजे. म्हणून त्यांनी आग्रहपुर्वक हस्तव्यवसायातून या शिक्षण या कल्पनेचा आग्रह धरला. त्यांच्यामते 'हस्तव्यवसायातून शिक्षण' झाल्याशिवाय व्यक्ति व समाज आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होणार नाही व शिक्षण स्वश्रमी बनणार आहे. त्यांच्यामते हस्तव्यवसायातून शिक्षण दिल्यास त्याचे अनेक लाभ मिळतात. यातून प्रशिक्षीत झालेले विद्यार्थी त्यांच्या भावी आयुष्यातील प्रश्न आणि अडचणीवर समर्थपणे मात करू शकतात.

**गांधीजींचा मते अभ्यासक्रम**

गांधीजींच्या मते अभ्याक्रम कसा असावा तर, शिक्षणांनी व्यक्तिमत्वाच्या सर्व पैलुंचा सुसंवाद साधला पाहिजे. असा गांधीजींचा आग्रह होता. नैतिक विकास हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्टय आहे असा त्यांचा विश्वास होता. गांधीजींची इच्छा आहे की, प्रत्येक मुलाने स्वतःमधील ईश्वरभक्तिची जाणिव करून एक दैवी मानव बनला पाहिजे. अभ्यासक्रम शिक्षणाची उद्दिष्ट्य साध्य करण्याचे प्रभावी साधन असते. याची महात्मा गांधीना कल्पना होती. त्यांच्यामते अभ्यासक्रम हा 'जीवनकेंद्रीत' असावा. महात्मा गांधीनी अभ्यासक्रमात कोणकोणत्या विषयाचा समावेश करावा ते ही सांगितलेले आहे. अभ्यासक्रम मुख्यतः शेती, सुतकताई, विणकाम, सुतारकाम, धातुकाम, बागकाम आदी हस्तउद्योगाचा समावेश असलेला असावा. बदलत्या परिस्थितीप्रमाणे नविन व्यवसायांचा यात समावेश केला जावा. हिशोब व्यवस्थित ठेवता यावा म्हणून त्यात गणित या विषयाचा समावेश असावा. थोडक्यात त्यांच्यामते अभ्यासक्रम हा विद्यार्थ्याचा सर्वांगिण विकास करणारा असावा.

**शिक्षणाची ध्येय**

गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात अध्यात्मिकतेला प्राधान्य स्थान होते. शिक्षणातही या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. मानवाचा समतोल सर्वांगिण व सुसंवादी विकास साधण्याच्या दृष्टीने शिक्षणाचे ध्येय दोन प्रकारात मांडले आहेत.

**अ) तत्कालिन ध्येय**

**१. चारित्र्यनिर्मिती करणे**

चारित्र्यनिर्मिती म्हणजे विविध गुणांची जोपसना करणे व ते गुण विद्यार्थ्यांत संक्रमित करण्याचा प्रयत्न करणे होय. संयम, सहिष्णुता, सदाचार, आत्मनिर्भरता, सत्याग्रह, धैर्य इत्यादी गुणांचा समावेश होतो.

**२. सर्वांगिण विकास करणे**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक तसेच अध्यात्मिक विकास शिक्षणातून साधला पाहिजे. त्याच्या विविध क्षमता जोपासल्या पाहिजेत व विकसित केल्या पाहिजेत.

**३. सांस्कृतिक शिक्षण देणे**

ज्या शिक्षणातून भारतीय संस्कृतीचा अविष्कार होईल असे शिक्षण गांधीजींना अभिप्रेत होते.

**४. अर्थोत्पादनक्षम शिक्षण देणे**

आपल्या कुटूंबाचे पालन पोषण करण्याची क्षमता शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांत यावयास हवी त्यासाठी व्यवसायिक शिक्षण देऊन त्यांची अर्थ उत्पादन करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी.

**ब) अंतिम ध्येय**

**१. सामाजिक जबाबदारीची जाणिव निर्माण करणे**

व्यक्ति आणि समाज यांची ध्येय एकमेकांस पुरक असली पाहिजे. जे शिक्षण आपण विद्यार्थ्यांना देणार ते सामाजिक वातावरणास पुरक असावे. शिक्षणातून विद्यार्थ्यांत सामाजिक जबाबदारीची जाणिव निर्माण झाली पाहिजे.

**२. अध्यात्मिक विकास साधणे**

व्यक्तिच्या जीवनाचे जे अंतिम ध्येय तेच ध्येय शिक्षणातून साध्य व्हावे असे त्यांचे मत होते. गांधीजी हे समन्वयवादीत होते. ते केवळ आदर्शाकडे बघून चालत नसत तर आदर्शाला व्यवहारिकतेची जोड दिलेली होती.

**३. गांधीजींचे शिक्षकांविषयीचे मत**

महात्मा गांधीनी बालककेंद्रित शिक्षणाचा पुस्कार केलेला आहे. परंतु त्यांनी शिक्षणात शिक्षकाला देखील महत्त्वाचे व प्रतिष्ठेचे स्थान दिले आहे. शिक्षकाचे मुख्य कार्य विद्यार्थ्याच्या सर्व क्षमता व शक्तिचा विकास करणे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगिण विकासाकडे लक्ष देणे हे असते. शिक्षकांनी केवळ पुस्तकी ज्ञान देण्याचे व विद्यार्थ्यांच्या डोक्यात माहिती कोंबण्याचे काम करता कामा नये. त्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उचित आकार दिला पाहिजे. शिक्षक हा विद्यार्थ्याच्या जीवनात प्रेरणा देणारा प्रेरक बनला पाहिजे. त्यांनी विद्यार्थ्याला विवेकी बनविले पाहिजे. शिक्षकांनी आपली भुमिका परिणामकारकरित्या पार पाडण्यासाठी स्वतःच्या कामाची व्यवस्थित नियोजन करावे. विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध कामांत योग्य मार्गदर्शन करावे. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या त्रुटी न रागावता सहजरित्या त्यांना दाखवून दिल्या पाहिजेत तरच तो विद्यार्थ्यांचा खरा मार्गदर्शक व तत्त्वज्ञ होऊ शकतो.

**४. गांधीजींचे विद्यार्थ्यांबद्दलचे मत**

विद्यार्थ्यांबद्दल ते म्हणतात, 'आजचे विद्यार्थी हे उद्याचे भावी नागरीक आहेत.' त्यामुळे त्यांनी अतिशय जबाबदारीने वागले पाहिजे. त्यांचे आदर्श त्यांनीच निवडून त्यांच्यातले चांगले गुण आचरणात आणावेत. विद्यार्थ्यांनी जातीभेद आणि अस्पृश्यता मानू नये. त्यांनी गरजू व्यक्तिंना मदत करावी. रूग्णांची सेवा सुश्रुषा करावी. ग्रामस्वच्छता आणि साक्षरता प्रसार इत्यादी विधायक आणि समाजउपयोगी कामात त्यांनी स्वतःला गुंतवून ठेवावे. सतत त्यांनी शिकत राहावे. नवनविन ज्ञान मिळवावे. प्राप्त केलेले ज्ञान समाजबांधवापर्यंत पोंहचावे. त्यांनी संयमी जीवन जगावे. गोर-गरीबांचे रक्षण करावे. धार्मिक तेढ, अथवा दंगधोपे झाल्यास अहिंसात्मक पद्धतीन ते शमविण्याचा प्रयत्न करावा. मुलांशी त्याचं वागणं सौजन्यपुर्ण असावं. धुम्रपान आणि इतरही वाईट व्यसनापासून त्यांनी स्वतःला दूर ठेवावं. त्यांच्या वागण्यात नम्रपणा असावा. विद्यार्थी दशेत असेपर्यंत संन्यासासारखं त्यांचं वर्तन असावं.

### सारांश

गांधी प्रणित शिक्षण पद्धतीत आदर्शवाद, निसर्गवाद आणि कार्यवाद यांचा सुंदर मिलाप आपल्याला दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाचा विचार गांधीजींनी त्यांच्या शिक्षणपद्धतीत केला आहे. या शिक्षणप्रणालीतील मुल्यशिक्षण ते व्यवसायशिक्षण अशा अनेक बाबींचा समावेश देशाच्या सर्व शैक्षणिक धोरणात झाल्याचे आपणास दिसून येते.

आजच्या जागतिकीकरणान आणि चंगळवादानं ग्रासलेल्या काळात महात्मा गांधीची एकूणच जीवनदृष्टी अधिक नैसर्गिक आणि सहज अशा शिक्षण पद्धतीकडे नेऊ शकते. या जीवनधारीत शिक्षणपद्धतीची रूजवात होण्याची आज खरी गरज आहे. आजच्या काळात महात्मा गांधीची ही केंद्रीय शिक्षणदृष्टी शिक्षणाच्या नव्या दिशा आणि नवे मार्ग यांच्याकडे नक्कीच नेऊ शकेल.

### संदर्भ सुची

१. महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञानः लेखक -डॉ. नागोराव कुंभार

२. गाँधी और शिक्षाः लेखक - डॉ. एम.के. मिश्रा, डॉ. कमल दाधीच

३. महात्मा गांधी विचारदर्शन  लेखक -प्रा. नागोराव कुंभार

४. सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा  लेखक-मो.क.गांधी